निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
२५ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: १९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### ट्रॅक्टर ट्रॉलीच्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या वारसांना १८.७५ लाखांची नुकसान भरपाई

**अंबड न्यायालयाचा मोठा निकाल**

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड/ प्रतिनिधी/** रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून धडक लागून झालेल्या भीषण अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या वारसांना १८,७५,३२०/- (अठरा लाख पंच्याहत्तर हजार तीनशे वीस) रुपये नुकसान भरपाई देण्याचा महत्त्वपूर्ण आदेश अंबड येथील मोटार अपघात प्राधिकरणाने दिला आहे. हा निकाल दिनांक २३ मार्च २०२६ रोजी देण्यात आला.नेमकी घटना काय?मूळचे मौजे मांडकी (ता. जि. औरंगाबाद) आणि सध्या गोलापांगरी (ता. जि. जालना) येथे वास्तव्यास असलेले सुरेंद्र जनार्दन थोरात हे १८ मे २०२१ रोजी रात्री साडेआठ ते नऊ वाजेच्या सुमारास आपल्या मित्रासह मोटारसायकलवरून जालना-अंबड रोडने येत होते. हरतखेडा फाट्याजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रॅक्टर ट्रॉलीला त्यांच्या मोटारसायकलची पाठीमागून जोरात धडक बसली. या भीषण अपघातात सुरेंद्र थोरात यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.न्यायालयीन लढा आणि निकालया अपघातानंतर मयताची पत्नी सुरेखा सुरेंद्र थोरात, मुले अनिकेत, प्रणव, प्रणाली आणि आई-वडील जनार्दन व सुमनबाई थोरात यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी अंबड येथील मोटार अपघात प्राधिकरणाकडे अर्ज दाखल केला होता. अर्जदारांच्या वतीने सादर करण्यात आलेले पुरावे आणि वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून, माननीय न्यायालयाने विमा कंपनीला वरील रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत.कायदेशीर बाजूया प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ड. के. आर. धबडकर यांनी प्रभावीपणे काम पाहिले, तर त्यांना ड. कृष्णा शर्मा यांनी मोलाचे सहकार्य केले.

### आमदार अनुराधा चव्हाण यांना फेसबुक लाईव्हवरून धमकी

**फुलंब्रीत भाजपा आक्रमक, कारवाईची मागणी**



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी/** फुलंब्री मतदारसंघाच्या आमदार श्रीमती अनुराधा चव्हाण यांच्याबद्दल फेसबुक लाईव्हद्वारे आक्षेपार्ह शब्दांत शिवीगाळ करत, त्यांना मारण्याची धमकी देणाऱ्या मंगेश साबळे याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी फुलंब्री तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने तहसीलदार योगिता खाटावकर यांना निवेदन देण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार दि. २४ मार्च २०२६ रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास भाजपा पदाधिकारी राजु तुपे हे फेसबुक पाहत असताना, मंगेश साबळे याने त्याच्या अधिकृत फेसबुक अकाउंटवरून लाईव्ह व्हिडिओ प्रसारित केला.

या व्हिडिओमध्ये त्याने असा आरोप केला की, फुलंब्री तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे आमदार अनुराधा चव्हाण या महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. मात्र, त्या केवळ भाजपा कार्यकर्त्यांच्याच शेताच्या बांधावर जात असून इतर पक्षाच्या शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहेत.

हे आरोप करताना साबळे याने अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन आमदारांना शिवीगाळ केली आणि त्यांचे 'थोबाड फोडण्याची' धमकी थेट लाईव्ह व्हिडिओमध्ये दिली.

भाजपा पदाधिकाऱ्यांचे निवेदन आणि इशारा

या घटनेनंतर फुलंब्री तालुक्यातील भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मंगेश साबळे याच्यापासून आमदार अनुराधा चव्हाण यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत भाजपाने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

लोकप्रतिनिधी विरोधात अशा प्रकारे चिथावणीखोर वक्तव्य करणे आणि धमकी देणे हा गंभीर गुन्हा आहे. संबंधित व्यक्तीवर तातडीने कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

निवेदन देताना वडोदबाजार गटाचे जिल्हा परिषद सदस्य गोपाल वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाथरीकर, नगरसेवक योगेश मिसाळ, वाल्मीक जाधव, देवगिरी साखर कारखान्याचे संचालक कल्याण चव्हाण, मयुर कोलते, बाळासाहेब तांदळे, राजेंद्र डकले, सुचित बोरसे, संतोष जाधव, विजय आहेर, अशिष वाघ, राजु खैरनार, भगवान तुपे, रामेश्वर चोपडे, गणेश राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### जालना महापालिकेचा अर्थसंकल्प सादर; विकासावर भर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/विशेष प्रतिनिधी/**जालना शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत आज आगामी वर्षाचा अर्थसंकल्प जाहीर करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त अशीमा मित्तल आणि स्थायी समिती सभापती अशोक पांगरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महत्त्वपूर्ण बैठकीत उपायुक्त नंदा गायकवाड यांच्यासह सर्व सभापती व उपसभापती उपस्थित होते. अर्थसंकल्पात शहराच्या पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मोहिमेसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. आयुक्तांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासकीय नियोजित आराखडा मांडला, तर लोकप्रतिनिधींनी विविध विकासकामांवर चर्चा केली. छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी या प्रसंगाचे छायाचित्रण केले.

# जालना जिल्हा परिषदेचा 'बजेट' धमाका!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/विशेष प्रतिनिधी/**सरकारी तिजोरीचे नियम बदलले, व्याजाचे उत्पन्न बुडाले, तरीही विकासाचा गाडा थांबणार नाही! जिल्हा परिषद जालनाचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम. यांनी आज २०२६-२७ या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प सादर केला. उत्पन्नाचे स्रोत ५० ते ६० टक्क्यांनी आटलेले असतानाही, प्रशासनाने कमालीच्या नियोजनाचा परिचय देत २२ कोटी ५५ लाख २० हजार रुपयांचे शिलकी (Surplus) अंदाजपत्रक सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

**उत्पन्नाचा मोठा धक्का, पण 'जालना पॅटर्न' सज्ज!**

शासनाच्या १४ फेब्रुवारी २०२४ च्या निर्णयानुसार निधी आता 'Virtual Personal Deposit account' मध्ये जमा होणार असल्याने व्याजाचे मोठे उत्पन्न बंद झाले आहे.

महसुली उत्पन्नात तब्बल ६०% घट होण्याची भीती असतानाही, प्रशासनाने हात न टेकता उत्पन्न वाढीचे '**आक्रमक मॉडेल**' समोर आणले आहे.

महसूल वाढीसाठीचे मास्टरस्ट्रोक:

**बांधकाम विभाग:** जि.प. परिसरात 'पे अँड पार्किंग' आणि चक्क Roof Top Restaurant (BOT तत्त्वावर) उभारणार!

## प्रमुख नाविन्यपूर्ण घोषणा:

१) शैक्षणिक क्रांती: जि.प. शाळेतील हुशार विद्यार्थ्यांची ISRO, DRDA, आणि IIT सारख्या संस्थांमध्ये वैज्ञानिक सहल (२५ लाख तरतूद).

२) महिला शक्ती: अंगणवाडी पर्यवेक्षकांना टॅब, ग्रामीण महिलांना कुक्कुटपालनासाठी मदत आणि विविध साहित्यांचा पुरवठा.

३) कृषी विकास: पेरणीसाठी शेतकऱ्यांना ५०% अनुदानावर मानवचलित टोकन यंत्र (Dibbler) मिळणार.

४) पशुसंवर्धन: शेळी दूध संकलन केंद्र आणि अंडी उबवणी केंद्र (Hatchery) प्रकल्पातून रोजगाराची संधी.

५) दिव्यांग कल्याण: ५० लाख रुपयांचा निधी खर्च करून ५ वेगवेगळ्या प्रवर्गातील दिव्यांगांना थेट अर्थसहाय्य.

खर्चाचे गणित (विभागनिहाय तरतूद - लाखात):

अनु. जाती-जमाती कल्याण: ३२१.११ लाख

पाणी पुरवठा (२०%): ३०० लाख

सार्वजनिक मालमत्ता: २७९.९८ लाख

पंचायतराज कार्यक्रम: २६८.२४ लाख

शिक्षण: ६०.०३ लाख




**शिक्षण विभाग:** रिकाम्या १८ शाळा भाड्याने देणार, शाळांची मैदाने सार्वजनिक कार्यक्रमांसाठी खुली करून उत्पन्न मिळवणार.

**आरोग्य विभाग:** प्राथमिक आरोग्य केंद्रांवर उपहारगृहे आणि नवीन गाळे उभारून १५-२० लाखांचे लक्ष्य.

**मत्स्य व्यवसाय:** लघु पाटबंधारे विभागांतर्गत तलावांचा लिलाव करून १०-१५ लाखांची कमाई.

विद्यार्थ्यांसाठी 'इस्रो'ची वारी, तर शेतकऱ्यांना 'टोपण यंत्र'!

या अर्थसंकल्पात केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर नाविन्यपूर्ण योजनांचा पाऊस पाडण्यात आला आहे.

यासाठी २ कोटी ४३ लाख १० हजार रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे.

> नियोजन, शिस्त आणि समन्वय राखल्यास आपण या आर्थिक संकटावर मात करू शकतो. जालना जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी प्रत्येक विभाग आता उत्पन्नाचे केंद्र म्हणून काम करेल.
>
> **- मीन्नू पी. एम. (प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना)**

हा अर्थसंकल्प मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुधीर चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन ओलफवार, मंगेश देशपांडे, व्ही. पाटील, महेंद्र गिरी आणि टीमने अत्यंत परिश्रमाने तयार केला आहे.

शासकीय अनुदानाच्या व्याजावर अवलंबून न राहता, स्वतःचे पाय रोवून उभा राहणारा हा 'स्वावलंबी अर्थसंकल्प' जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, यात शंका नाही!.

## विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने कार्य करावे - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज विभागातील सर्व जिल्हाधिकारी व नगरपालिकांच्या मुख्याधिकारी यांची बैठक घेऊन नगरपालिका प्रशासनातील प्रलंबित मुद्यांचा सविस्तर आढावा घेतला. नगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने कार्य करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.




> **नगरपालिका प्रशासनातील प्रलंबित विषयांचा विभागीय आयुक्तांकडून आढावा**

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला नगर प्रशासन विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे उपस्थित होते. तर दुरदृश्य प्रणालीव्दारे विभागातील जिल्हाधिकारी, नगर परिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते. पाणीपुरवठा, स्वच्छता, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली, नागरी पायाभूत सुविधा, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० तसेच 'नमो उद्यान' स्पर्धा यांसह विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रस्तावांची स्थिती, निधीचा वापर आणि अंमलबजावणीतील अडचणींचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कामकाजात गती आणण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत मंजूर व प्रलंबित घरकुलांची माहिती तपासून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावर भर देण्यात आला. जिओ-टॅगिंग व एमआयएस प्रणाली अद्ययावत ठेवून पारदर्शकता वाढविणे आणि लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा प्रभावी लाभ पोहोचविणे आवश्यक असल्याचे विभागीय आयुक्तांनी नमूद केले. सर्वांसाठी घर हे उद्दिष्ट निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

'नमो उद्यान' स्पर्धेच्या अनुषंगाने विविध नगरपालिकांनी केलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून दर्जेदार व सुबक उद्याने विकसित करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे करा तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नगरपालिकांचा गौरव करत इतरांनीही स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी सांगितले.

मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीच्या बाबतीत अनेक नगरपालिकांमध्ये अपेक्षित प्रगती न झाल्याचे निदर्शनास आले. थकबाकी कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबवून महसूल वाढविण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले. नियमित व प्रभावी वसुलीद्वारे विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध होईल, असे विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी स्पष्ट केले.

नगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, पादचारी मार्ग, नाले व शासकीय जागांवरील वाढत्या अतिक्रमणाच्या पार्श्वभूमीवर एप्रिलपासून विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमणे काढून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले.

## वृत्तपत्रांच्या गळचेपीविरोधात पत्रकारांचा एल्गार; १५०% दरवाढीसाठी अंबडमध्ये तहसीलदारांना घेराव!



**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (जालना)** लोकशाहीचा चौथा स्तंभ आर्थिक संकटात सापडलेला असताना शासन ढिम्म असल्याचा संताप व्यक्त करत, जालना जिल्ह्यातील पत्रकारांनी आज अंबड तहसील कार्यालयावर धडक दिली. २०१९ पासून कागद, वीज आणि छपाई साहित्यात १५०% दरवाढ होऊनही शासकीय जाहिरात दर वाढले नसल्याने, लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया आणि स्थानिक पत्रकार संघटनांच्या वतीने नायब तहसीलदार संजय झोरे यांना आक्रमक निवेदन देण्यात आले. आता चर्चा नाही, तर थेट निर्णय हवा, अशी भूमिका घेत पत्रकारांनी जाहिरात दरात १५०% वाढ, ३० दिवसांत देयकांचा भरणा आणि ई-टेंडर नोटिसेस पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध करण्याची मागणी केली.

यावेळी संतोष जिगे, शिवाजी मस्के, गणेश सपकाळ यांच्यासह अनेक पत्रकारांनी सरकारला इशारा दिला की, जर पेन्शनचे निकष शिथिल करून जाहिरात धोरणात न्याय मिळाला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

# दोषी ठेकेदारावर 'मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करा, अन्यथा महामार्ग रोखणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद / प्रतिनिधी/** सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर (NH-211) प्रशासकीय अनास्था आणि ठेकेदाराच्या मुजोरीमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. पाचपीरवाडी उड्डाणपुलाखालील सदोष कामामुळे रस्ता आता 'हायवे' न राहता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. या जीवघेण्या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी शेतकरी कृती समितीने केली आहे. ३१ मार्चपर्यंत कारवाई न झाल्यास भव्य 'रस्ता रोको' करण्याचा इशारा समितीने दिला असून यामुळे प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. गंगापूर तालुक्यातील पाचपीरवाडी उड्डाणपुलाखाली सध्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. मात्र, हे काम करताना ठेकेदाराने सुरक्षेचे सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत.नियोजनशून्य काम: दोन्ही बाजूंचे सर्व्हिस रोड कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आले आहेत.दिशादर्शकांचा अभाव: रस्ता वळवताना (Diversion) कुठेही रेडियम बोर्ड किंवा दिशादर्शक फलक लावलेले नाहीत.



भीषण अपघातांची मालिका: गेल्या ३ दिवसांत येथे ३ भीषण अपघात झाले आहेत. यात कसाबखेडा येथील दोन तरुणांना आपला जीव गमवावा लागला, तर २३ मार्च रोजी दिवशी तांडा येथील एक युवक गंभीर जखमी झाला.

> लोकांच्या सोयीसाठी बनवलेला महामार्ग जर मृत्यूचा सापळा बनत असेल, तर त्याला जबाबदार असणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत उभे करणे गरजेचे आहे. प्रशासनाचे उत्तर म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे.
>
> **- इंजी. महेशभाई गुजर (शेतकरी कृती समिती)**

**प्रशासनाचा टोलवाटोलवीचा कारभार**

शेतकरी कृती समितीचे इंजी. महेशभाई गुजर यांनी २४ डिसेंबर २०२५ रोजीच कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत तक्रार केली होती. मात्र, प्रशासनाने पावसामुळे खड्डे पडले असून दुरुस्ती सुरू आहे, असे मोघम आणि असमाधानकारक उत्तर देऊन आपली जबाबदारी झटकली. प्रत्यक्षात कोणत्याही नियोजनाशिवाय सुरू असलेल्या कामामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**शेतकरी कृती समितीच्या प्रमुख मागण्या:**

१. गुन्हे दाखल करा: अपघातांना कारणीभूत असणाऱ्या ठेकेदारावर आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे नोंदवावेत.



२. कायमस्वरूपी तोडगा: पावसाळ्यात उड्डाणपुलाखाली साचणाऱ्या पाण्याचा निचरा होईल, असा शास्त्रीय आराखडा तयार करूनच काम पूर्ण करावे.

३. संयुक्त समिती: पोलीस प्रशासन, तज्ज्ञ अभियंता आणि स्थानिक नागरिक यांची समिती स्थापन करूनच कामाचे नियोजन करावे.

**३१ मार्चला 'रणसंग्राम'!**

शेतकरी कृती समितीचे इंजी. महेशभाई गुजर, अशोक किर्तीकर, धरमसिंग बिमरोट आणि विलास गवळी यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर ३१ मार्च २०२६ पर्यंत ठेकेदारावर कारवाई झाली नाही, तर पिंपळगाव, दिवशी, रायपूर, पाचपीरवाडी व कसाबखेडा परिसरातील नागरिक आणि अपघातग्रस्त कुटुंबे महामार्गावर उतरून भव्य 'रस्ता रोको' आंदोलन करतील. या आंदोलनामुळे होणाऱ्या परिणामांना पूर्णतः प्रशासन जबाबदार असेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# भोंदूगिरीची कीड: पुरोगामी महाराष्ट्राच्या प्रतिमेला लागलेला कलंक

महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची आणि वैचारिकांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी सुसंस्कृत झालेल्या या मातीत आज अशोक खरात सारख्या भोंदूबाबा आणि त्याच्या वासनांध 'लीला' समोर याव्यात, ही अत्यंत शरमेची बाब आहे. तथाकथित 'कॅप्टन' म्हणवून घेणाऱ्या या नराधमाचे १०० हून अधिक व्हिडिओ समोर येणे, हे केवळ एका व्यक्तीचे पाप नसून आपल्या सामाजिक अधोगतीचे लक्षण आहे.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या भोंदूबाबाचे भक्त केवळ अशिक्षित ग्रामीण जनता नसून, समाजातील राजकीय, प्रशासकीय आणि उच्चभ्रू वर्गातील लोक आहेत. जेव्हा समाजाचे नेतृत्व करणारे लोकच अशा ढोंगी बाबांच्या चरणी नतमस्तक होतात, तेव्हा सर्वसामान्य जनतेचा विवेकही डळमळीत होतो. या भक्तांच्या पाठबळामुळेच अशा भोंदूंचे मनोबल वाढते आणि ते कायद्याला जुमानत नाहीत.

महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने जादूटोणाविरोधी कायदा संमत केला. यासाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. परंतु, खरात सारख्या प्रकरणांकडे पाहिल्यावर प्रश्न पडतो की, खरोखरच या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का?राजकीय वरदहस्त: संविधानाची शपथ घेणारे लोकप्रतिनिधी जेव्हा अशा बाबांच्या दरबारात हजेरी लावतात, तेव्हा पोलिसांवरील दबाव वाढतो आणि कायद्याचा धाक संपतो.प्रशासकीय दुर्लक्ष: गावात किंवा शहरात उघडपणे चालणाऱ्या या 'दुकानदाऱ्या' प्रशासनाला दिसत नाहीत का?

अध्यात्म आणि शोषण यातील पुसट होत चाललेली रेषा ही चिंतेची बाब आहे.माणसाची हतबलता आणि भीती हाच भोंदूबाबांच्या व्यापाराचा कच्चा माल असतो.अशोक खरातने महिलांच्या असहायतेचा फायदा घेऊन जे कृत्य केले, ते माणुसकीला काळीमा फासणारे आहे. अशा 'कॅप्टन फाईल्स' महाराष्ट्रातील अनेक कोपऱ्यांत दडलेल्या असतील. या केवळ एका खरातची छाटणी करून भागणार नाही, तर या प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या मानसिकतेवर प्रहार करावा लागेल.

केवळ अशोक खरातवर कारवाई होऊन चालणार नाही, तर त्याच्या या कृत्यात सहभागी असलेल्या आणि त्याला राजाश्रय देणाऱ्या त्याच्या 'पांढरपेशा' भक्तांचीही चौकशी व्हायला हवी.

कठोर शिक्षा: अशा नराधमांना अशी शिक्षा व्हावी की पुन्हा कोणाचेही असे धाडस होणार नाही.सामाजिक प्रबोधन: शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांतून विज्ञाननिष्ठेचा प्रसार करणे आवश्यक आहे.विवेक जागृती: जोपर्यंत जनता स्वतःचा 'विवेक' गहाण ठेवणे थांबवणार नाही, तोपर्यंत नवीन 'खरात' जन्माला येतच राहतील. पुरोगामी महाराष्ट्र ही केवळ एक बिरुदावली नसून ती एक जबाबदारी आहे. जर आपल्याला ही 'कीड' मुळापासून उपटून टाकायची असेल, तर राजकारण आणि धर्म यांची सरमिसळ थांबवून, कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे हाच एकमेव पर्याय आहे. डॉ. दाभोळकरांचे बलिदान वाया जाऊ द्यायचे नसेल, तर समाजाने अंधश्रद्धेच्या बेड्या तोडून विज्ञानाची वाट धरली पाहिजे.

# विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी विभागात सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भारतातील ९ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. पुढील टप्यात महाराष्ट्रासह अन्य राज्यातही सदर कार्यक्रम लवकरच सुरु होणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा.मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडुन प्राप्त निर्देशानुसार सदरच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी आपल्या विभागात सुरु करण्यात आलेली आहे.

आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (Special Intensive Revision) अनुषंगाने प्रथमतः मॅपींगची कार्यवाही सेल्फ पध्दतीने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी Table Top activity द्वारे करुन घेणार असुन यामध्ये सन २००२ ची विशेष सखोल पुनरिक्षणाची अंतिम मतदार यादी, सन २०२४ घ्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीसह मॅप करुन, मॅपींगची कार्यवाही पुर्ण करणार आहे. नंतर Top activity द्वारे Self पध्दतीने (One-to-One) प्राप्त न होणाऱ्या नोंदी संदर्भात झीसशपू Mapping कार्यपध्दती अवलंबून मॅपींग करावयाची आहे यामध्ये सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीतील ज्यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमध्ये उपलब्ध नसतील, अशा मतदारांचे मॅपींग त्यांचे आई/वडील किंवा आजी/आजोबा यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदारयादीमध्ये शोधुन त्याप्रमाणे नोंदी घेऊन झीसशपू चर्ळिपस पुर्ण करणार आहे. या पध्दतीने मॅपींग केल्यानंतर, सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अंतिम मतदार यादीतील शिल्लक राहिलेल्या णपारशिव मतदारांचे मॅपींग करण्याच्या दृष्टीने संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे संबंधित मतदारांच्या निवासाचा पत्यावर जाऊन ते स्वतः किंवा त्यांचे आई-वडिल / आजी-आजोबा यांचे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमधील माहिती जाणून घेऊन त्या माहितीच्या आधारे भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर (https://voters.eci.gov.in) भेट देऊन त्याद्वारे णपारशिव मतदारांचे चर्ळिपस करणार आहे.

तसेच अस्पष्ट व मानवी नसलेल्या छायाचित्राची पडताळणी व ऊडए ( वशोसीरहिळल ेळाळश्ररी शपीीळशी ) च्या अनुषंगाने पडताळणी व वगळणी बाबतची कार्यवाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी करणार आहेत.


विभागीय आयुक्त संभाजीनगर यांनी याबाबत विभागातील सर्व जिल्हाधिकारी, आयुक्त महानगरपालीका व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची दिनांक २३.०३.२०२६ रोजी बैठक घेडुन कामकाजाचा आढावा घेतला व मार्गदर्शन केले.

करीता या राष्ट्रीय कामासाठी मतदार केंद्रनिहाय नियुक्त केलेले इडज (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) यांना आवश्यक ते सहकार्य नागरीकांनी करावे असे आवाहन मतदार यादी निरिक्षक तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# प्रसिद्ध अभिनेत्री कृतिका गायकवाड यांनी घेतले बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वराचे दर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी** /खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील बारावी ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिरात दर्शन घेतले.मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री कृतिका गायकवाड यांनी मंगळवारी खुलताबाद तालुक्यातील जागतिक वारसा लाभलेल्या वेरूळ नगरीला भेट दिली. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्यांनी बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेव मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेतले.



यावेळी कृतिका गायकवाड यांनी मंदिराच्या पवित्र वातावरणात महादेवाचे दर्शन घेऊन अभिषेक केला. दर्शनानंतर त्यांनी वेरूळ येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर तीर्थकुंडावर आयोजित करण्यात आलेल्या लेझर शोचा आनंद लुटला. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित हा भव्य लेझर शो पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले व इतिहासाचे असे प्रभावी सादरीकरण कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

याप्रसंगी त्यांनी उपस्थित पत्रकारांशी मनमोकळी बातचीत केली. वेरूळ नगरीतील अध्यात्म आणि इतिहासाचा संगम मनाला शांती देणारा असून, या भेटीमुळे एक वेगळी ऊर्जा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी मंदिर परिसरातील भाविक आणि चाहत्यांनी त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी गर्दी केली होती.

# जालना महानगरपालिकेच्या ताफ्यात नवीन वाहने दाखल; धूळ ओढणारी मशीन, बुलडोझर अन् घंटागाड्यांचे लोकार्पण



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी)** जालना शहराच्या स्वच्छतेसाठी आणि सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने एक मोठे पाऊल उचलले आहे. शासनातर्फे प्राप्त झालेल्या अत्याधुनिक यंत्रसामग्रीचे लोकार्पण नुकतेच उत्साहात पार पडले. यामध्ये प्रामुख्याने रस्ते साफ करण्यासाठीच्या तीन 'डस्ट सक्शन' (धूळ ओढणारी) मशिन्स, एक शक्तिशाली बुलडोझर आणि दोन नवीन घंटागाड्यांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी तथा आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्यात जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त यांच्या हस्ते फित कापून आणि नारळ वाढवून या सर्व वाहनांचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता, ही यंत्रसामग्री स्वच्छतेच्या कामात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

या विशेष प्रसंगी शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असलेले सभापती, उपसभापती आणि सर्व सन्माननीय नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानगरपालिका झाल्यानंतर शहराला अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत यावेळी लोकप्रतिनिधींनी व्यक्त केले.

**धूळ ओढणारी मशीन:** शहरातील मुख्य रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी या तीन मशिन्सचा वापर होणार असून, यामुळे हवेच्या प्रदूषणात घट होईल.

**बुलडोझर:** शहरातील अनधिकृत बांधकामे, कचऱ्याचे ढीग हटवणे आणि रस्ते रुंदीकरणाच्या कामात यामुळे वेग येईल.

**घंटागाड्या:** कचरा संकलनासाठी आणखी दोन गाड्या मिळाल्याने प्रभागांमधील कचरा उचलण्याची प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे.

या नवीन यंत्रसामग्रीमुळे जालना शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त होण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी महानगरपालिकेचे विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दुःख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्र्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते. तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल. आज अयोध्येतील राम मंदिरमुळे मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे. कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग) असतात.मु मे राम बगल में छुरी अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी रक्तबीज राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल. जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल. रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

(स्वतंत्र पत्रकार ) नागपूर.

## फुलंब्री तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीत

# शासकीय योजनेच्या नावाखाली लाखो रुपयांचा भ्रष्टाचार, सरपंच उपसरपंच व ग्रामसेवकांची मिलीभगत

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी** / फुलंब्री तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये २०२० पासून ते मार्च २०२६ पर्यंत प्रत्येक गावात दलीतवस्ती सुधार योजना, व १५ वा वित्त आयोग या कामाच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची अंतर्गत गावागावात कामे करण्यात आली असून अनेक गावामध्ये सरपंच यांनी दलीतवस्ती सुधार योजनेची कामे दलित वस्तीत केली नाहीत. १५ वा वित्त आयोगाचा २०% टक्के निधी दलित वस्तीत खर्च करण्यात आलेला नाही. सरपंच / ग्रामसेवक यांच्या मनमानीमुळे या योजनेचा बट्ट्याबोळ झाला असून रितसर निधी हडपण्याचा प्रकार दिसून येत आहे. याविरोधात फुलंब्री तहसील कार्यालय समोर काल दिनांक २३ मार्च रोजी वंचित बहुजन आघाडी च्या वतीने उपोषण करण्यात आले .




सदरील योजनेच्या कामा संबंधित गटविकास अधिकारी व पंचायत समिती यांना वेळोवेळी निवेदन देऊन ही प्रत्येक गावाची दलीत वस्ती सुधार योजना व १५ वा वित्त आयोगाच्या कामांची माहिती विचारली असता जशी प्रत्येक गावात केलेल्या कामाचे नाव, अंदाजपत्रक, प्रशासकीय आदेश, एम. बी रेकॉर्ड अशी माहिती मागितली असता गटविकास अधिकारी ही माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे.

आपणास विनंती की, या कामात बराचसा भ्रष्टाचार आढळून येत असून प्रत्येक गावातल्या कामाची चौकशी समिती नेमण्यात यावी व भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.या मागणी करिता लोकशाही मार्गाने तहसिल कार्यालयासमोर काल दि. २३ मार्च २०२६ रोजी आमरण उपोषण केले.

फुलंब्री तहसील कार्यालयाचे उपविभागीय कार्यालय औरंगाबाद येथे स्थलांतरित झाल्यामुळे फुलंब्री तालुक्यातील शेतकरी व सामान्य लोकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण दस्ताऐवजासह करिता उपविभागीय कार्यालय फुलंब्री येथे तात्काळ चालू करण्यात यावे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडी तालुका उपाध्यक्ष पप्पू जाधव, काकासाहेब शिरसाठ , काकासाहेब थोरात यांनी औरंगाबाद जिल्हाधिकारी, पैठण फुलंब्री उपविभागिय अधिकारी, औरंगाबाद ग्रामीण पोलिस अधिक्षक, व फुलंब्री च्या तहसीलदार यांना आपल्या मागणीचे निवेदन देण्यात आले .

# एकजूट होऊया, क्षयरोगाला हरवू या!;जागतिक क्षयरोग दिनानिमित्त पारुंडी येथे जनजागृती रॅली

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी**/एकजूट होऊया, क्षयरोगाला हरवू या हा नारा देत पैठण तालुक्यातील पारुंडी येथे जागतिक क्षयरोग दिनानिमित्त भव्य आरोग्य जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र बालानगर आणि 'ह्युमाना पीपल्स टू पीपल इंडिया' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





विद्यार्थ्यांची प्रभातफेरी आणि मार्गदर्शन क्षयरोग (TB) या आजाराबद्दल समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी आणि लक्षणे आढळल्यास त्वरित उपचाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातून रॅली काढली. हातात जनजागृतीचे फलक आणि घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी आयोजित सभेत उपस्थित आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वेळेवर निदान आणि पूर्ण उपचार घेतल्यास क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो.

या कार्यक्रमाला गावातील प्रमुख पदाधिकारी आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

ज्यात प्रामुख्याने ह्युमाना संस्था: प्रोजेक्ट लीडर शंकर लाल गुर्जर, हेल्थ एक्सलेटर मनिषा खवाटे व प्रियंका थोरात.आरोग्य विभाग: डॉ. संदीप चव्हाण आणि आशा वर्कर शोभा अडगळ,ग्रामपंचायत सरपंच दत्तू दौंड, उपसरपंच झाकीर शेख, ग्रामसेवक व्ही. एस. वानखेडे, नितीन बाबासाहेब निसर्गे आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य.शिक्षण विभाग: शिक्षक निर्दुडे सर, खजिंणकर सर, सुधाकर मोठे, शिंदे अमर.

पारुंडी गावातील नागरिकांनी आणि तरुणांनी या मोहिमेत हिरीरीने सहभाग नोंदविला. टीबी मुक्त भारत करण्यासाठी प्रत्येकाने जागरूक राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय कर्मचारी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लासुर स्टेशन येथील संबोधी बुध्द विहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बैठक संपन्न




**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी**/गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील संबोधी बुध्द विहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते

सार्वजनिक जयंती उत्सव २०२६, निमित्त समितीची, बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. संबोधी,बौद्ध,विहार,येथे,सर्व,भिमसैनिक,यांच्या,मार्गदर्शनाखाली ही बैठक संपन्न झाली.बैठकीत यंदाची जयंती भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे, डिजिटल बँड पथक भव्य दिव्य व्यासपीठ तसेच भीससैनीकांना फेटे परिधान करण्यात येईल दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याचा ऐतिहासिक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला, प्रबोधनपर आणि सामाजिक संदेश देणारा उत्सव साजरा करण्याचा हा आदर्श उपक्रम ठरणार आहे. दरम्यान बैठकीस प्रमुख मार्गदर्शन म्हणू जयंतीचा मुख्य उद्देश म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला.यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, दानदाते, समाजबांधव व महिला मंडळ उपस्थित होते.आपण सर्वांनी मिळून हा उत्सव अभूतपूर्व, विचारप्रधान आणि समाजासाठी प्रेरणादायी करूया, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले.

## संक्षिप्त

### राजेंद्र गव्हाणे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सन्मानाने सन्मानित

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** / महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत व्यसनमुक्ती क्षेत्रात अति उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती व संस्थांसाठी महाराष्ट्र शासना कडुन जाहीर झालेला व अति प्रतिष्ठेचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार कन्नड नगरीतील सामाजिक व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री राजेंद्र नामदेवराव गव्हाणे यांना जाहीर झाला आहे.



सन २०२०-०२१ ते सन - २०२४०२५ या कालावधीत व्यसनमुक्ती साठी अत्यंत महत्त्वाचे योगदान व व्यसनापासून अनेक नागरिकांना मुक्त करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राज्य शासना कडुन व्यक्ती व संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. ई.सन-२०२१ साठी कन्नडचे जेस्ट सामाजिक कार्यकर्तेश्री. राजेंद्र नामदेवराव गव्हाणे यांची राज्यस्तरीय निवड समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांनी हा देदीप्यमान पुरस्कार राजेंद्र गव्हाणे यांना जाहीर केला आहे.सदर पुरस्कार वितरण सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम सोहळा दि.२५व २६मार्च रोजी मुंबई स्थित यशवंतराव चव्हाण सभागृह नरिमन पॉईंट मुंबई येथे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्राताई पवार, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना. रामदास रावजी आठवले,छ.संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजयजी शिरसाट,ना.अतुलजी सावे,राहुलजी नार्वेकर,माधुरीताई मिसाळ या मान्यवरांच्या हस्ते वितरित होणार आहे.

### बुधवारी गोळीबार सराव; सतर्कतेचे आवाहन


**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ ग्रामीण पोलीस आस्थापनेवरील अधिकारी यांचा गोळीबार सराव बुधवार दि.२५ रोजी समादेश,रा.रा.पोबल गट क्र.१४,सातारा परिसर फायरबट येथे होणार आहे. या कालावधीत गट क्रं.१४ फायरींग बट हद्दीतील नागरिकांनी सतर्क रहावे,असे आवाहन राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) यांनी केले आहे.

### पिशोर येथील हिराजी बाबा यात्रा उत्सवला मंगळवारपासून सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी**/ कन्नड तालुक्यातील पिशोर येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हिराजी बाबा यात्रा उत्सवाला दि. २४ पासून सुरुवात होणार असून तब्बल १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेसाठी परिसरासह दूरदूरच्या गावांतून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही या यात्रेसाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून गावात यात्रेची जोरदार तयारी सुरू आहे.हिराजी बाबा हे अनेक भाविकांचे श्रद्धास्थान मानले जातात.




आपल्या मनातील नवस पूर्ण करण्यासाठी भाविक मोठ्या भक्तिभावाने हिराजी बाबा यांच्या दर्शनासाठी पिशोर येथे येतात. या यात्रेला धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वही लाभले आहे. त्यामुळे दरवर्षी हजारो भाविक या यात्रेत सहभागी होत असतात.यात्रेच्या काळात पिशोर गावात मोठी बाजारपेठ उभी राहते. यात्रेमध्ये राहाट पाळणे, 'मौत का कुवा', तसेच विविध प्रकारची खेळणी, कपडे, भांडी, मिठाई, खाऊ आणि जनरल वस्तूंची दुकाने मोठ्या प्रमाणावर थाटली जातात. त्यामुळे यात्रेला येणाऱ्या भाविकांना धार्मिक दर्शनासोबतच मनोरंजन व खरेदीचा आनंदही घेता येतो. लहान मुलांसाठी विविध खेळणी आणि झोपाळे हे यात्रेचे विशेष आकर्षण ठरत असतात.

या यात्रेची खास बाब म्हणजे दूरदूरच्या गावांतून लेकी-बाळी आणि कुटुंबिय मोठ्या श्रद्धेने हिराजी बाबा यांच्या दर्शनासाठी येत असतात. अनेक भाविक आपल्या नवसपूर्तीसाठी येथे हजेरी लावतात. त्यामुळे यात्रेच्या काळात पिशोर गावात भक्तिमय वातावरण निर्माण झालेले पाहायला मिळते.यात्रेदरम्यान भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता पिशोर पोलीस स्टेशनच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. संपूर्ण यात्रा परिसरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाणार असून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या यात्रेचा समारोप पारंपरिक कुस्ती स्पर्धेने केला जातो. शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या कुस्ती स्पर्धेला परिसरातील कुस्तीपटू तसेच कुस्तीप्रेमी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहतात. त्यामुळे ही कुस्ती स्पर्धा यात्रेचे आणखी एक प्रमुख आकर्षण ठरते.पिशोर येथील हिराजी बाबा यात्रा ही परिसरातील एक प्रसिद्ध आणि ऐतिहासिक यात्रा म्हणून ओळखली जाते. यंदाही या यात्रेसाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्हा ग्रंथोत्सवाचे थाटात उद्घाटन;

# सुजाण समाज घडविण्यासाठी ग्रंथ वाचनाची चळवळ व्हावी- पुरुषोत्तम भापकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ ग्रंथ वाचनातून अनेक व्यक्तिमत्व घडले. परिवर्तन घडविण्याचे काम ग्रंथ करत असतात. अशी ही ग्रंथ वाचनाची चळवळ ही सुजाण समाज घडविण्यासाठी आवश्यक असून त्यास समाजाचे पाठबळ असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी पुरुषोत्तम भापकर यांनी आज केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचलनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, यांच्या वतीने जिल्हास्तरीय छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. आज या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले.









**ग्रंथ दिंडीने प्रारंभ**

आज सकाळी ९ वा. ग्रंथोत्सवानिमित्त ग्रंथ दिंडी क्रांती चौकातून निघाली.महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते या दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. दिंडीत संविधान ग्रंथ ठेवून त्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. वरिष्ठ कोषागार /-अधिकारी वैजनाथ शेळके, मानव विकास आयुक्तालयाचे सहाय्यक आयुक्त सुनिल सुर्यवंशी, प्रकाशक संघटनेचे कुंडलिक अतकरे, शिक्षण विस्तार अधिकारी जालम चौरे, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अधिकारी सुभाष साबळे आदी मान्यवर व पारंपारिक वेषभूषा केलेले शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी यात सहभागी झाले होते.

**ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन**

समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे ग्रंथोत्सवाचे मुख्य आयोजन करण्यात आले होते. तेथील प्रांगणात स्थापीत केलेल्या ग्रंथ प्रदर्शन स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सनदी अधिकारी पुरुषोत्तम भापकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, ज्येष्ठ साहित्यीक डॉ. दादा गोरे, ग्रंथ निवड समिती सदस्य गुलाबराव मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

त्यानंतर दीपप्रज्वलनाने मुख्य सोहळ्यास प्रारंभ झाला.

**ग्रंथालये हीच तीर्थक्षेत्र**

आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री. भापकर म्हणाले की,ग्रंथोत्सव म्हणजे साहित्य आणि शिक्षणाची वारी असून आपण सारेत्याचे वारकरी आहोत. ग्रंथालयांना आपण आपली तीर्थक्षेत्रे मानली पाहिजेत. ग्रंथसंपदा ही आपल्या प्रगतीचे दिशा दाखवते. ज्ञान आणि माहितीच्या या प्रवाहात वाचक ते ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील प्रत्येकाचे योगदान आहे.समाज सुजाण बनविण्यात ग्रंथांचे मोठे योगदान आहे.मुल्यवान समाज बनवायचा संकल्प आपण साऱ्यांनी करुन त्यासाठी ग्रंथोत्सवासारख्या उपक्रमांना पाठबळ द्यायला हवे.प्रत्येक गावात ग्रंथालय आवश्यक आहे. खेळणं आणि वाचणं यातून समृद्ध व्यक्तिमत्व आकाराला येतं. मानवी समाजाचे वैचारीक भरण पोषण पुस्तकांमुळे होते,असेही श्री, भापकर यांनी सांगितले.

ग्रंथालय दुपारच्या सत्रात 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि ग्रंथालये' या विषयावरील परिसंवाद पार पडला. अध्यक्षस्थानी डॉ. रा. शं.बालेकर होते. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. अनिल लहाने यांनी आपले अभ्यासपूर्ण विचार या परिसंवादात मांडले. ग्रंथालय चळवळीला, अचूक संदर्भसाहित्य शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही ग्रंथालय चळवळीला नेहमीच पूरक ठरेल असा विश्वास सर्व वक्त्यांनी व्यक्त केला.

**काव्यवाचनाने आली रंगत**

सायंकाळी काव्यवाचन कार्यक्रमामुळे रंगत आली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.ललित अधाने हे होते. तर विष्णू सुरासे, हबीब भंडारे, देवानंद पवार, श्रीमती माधुरी चौधरी,सिंधुताई क्षीरसागर, कावेरी खरात, भक्ती शिंह्रे, धम्मपाल जाधव हे यांनी कवितांचे सादरीकरण केले.

**दुसऱ्या दिवशी भरगच्च कार्यक्रम**

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी बुधवार दि.२५ रोजी सकाळी ११ वा. 'अहिल्यादेवी होळकर यांचे कार्यः सांस्कृतिक वारसा आणि समाजधारणा' या विषयावर परिसंवाद होईल. अध्यक्षस्थानी ड वैशाली डोळस राहतील. प्रा. डॉ. संजय गायकवाड, ड. वैशाली कडू, प्रा. महेश खरात हे वक्ते आपले विचार मांडतील. दुपारी २ वा. कथाकथकन कार्यक्रमात नामदेव निकम, संतोष तांबे, निवृत्ती काळे हे सहभागी होतील तर गेनू शिंदे हे अध्यक्षस्थानी राहतील.

दुपारी साडेतीन वा. गजल यात्रा या कार्यक्रमात रमेश ठोंबरे, गिरीश जोशी, ऋषभ कुलकर्णी, अर्जून गायकवाड, अमेय तांदुळजे हे सहभागी होतील. सायं.साडेचार वा. समारोप व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यीक डॉ. ऋषिकेश कांबळे हे राहतील. जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, सहा. ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील. सम्राटसिंग राजपुत, साहित्यिक डी.एस. काटे, ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र वाणी आदी मान्यवर उपस्थित राहतील.

**दुर्मिळ ग्रंथ खरेदीची संधी**

वाचकांना व ग्रंथप्रेमींना ग्रंथप्रदर्शन, ग्रंथ खरेदीची संधी लाभणार असून विविध परिसंवादांतून वैचारीक मेजवानीही मिळणार आहे.या ग्रंथोत्सवात सहभागाचे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष सुनील हुसे, सदस्य जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे, प्रकाशक संघटनेचे कुंडलिक अतकरे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा सदस्य सचिव सुभाष साबळे यांनी केले आहे.

## प्रलंबित प्रकरणे दोन महिन्यांत निकाली काढण्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

बैठकीत बिडकीन एमआयडीसी साठी संपादित करण्यात आलेल्या वर्ग-२ जमिनीच्या मोबदल्याचे वाटप तसेच शिल्लक प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ही सर्व प्रकरणे किमान दोन महिन्यांत अंतिम करण्याचे निर्देश देण्यात आले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला एम.आय. टी.एल., डी.एम.आय.सी. प्रकल्पग्रस्त समिती, बिडकीन लोकप्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

फळझाडे, विहिरी, बोरवेल व इतर मालमत्तांच्या मोबदल्याबाबत डी.एम.आय.सी.कडे निधीची मागणी करण्यात आली असून निधी प्राप्त होताच प्रलंबित खातेदारांना मोबदला वितरित केला जाईल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.



पोटखराब जमिनीच्या मोबदल्याबाबत शेतकरी काम बंद करत असल्याची बाब गांभीर्याने घेण्यात आली. पात्र लाभधारकांची महसूल अभिलेखातून माहिती काढून नियमानुसार मोबदला वाटप करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी पैठण/फुलंब्री यांना देण्यात आले.

संपादित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यात मुळ मालकांच्या नावांबाबत विसंगती आढळून आल्याने, पूर्वीच्या बक्षीसपत्रे व दानपत्रांच्या नोंदी महसूल अभिलेखात न झाल्याची बाब निदर्शनास आली.

याबाबत आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिले. निवाड्यातील शिल्लक क्षेत्राच्या मोबदल्याबाबत, ७० टक्के मोबदला वितरित झाला असून उर्वरित २० टक्के मोबदला विनापरवानगी खरेदी-खत इत्यादी कारणांमुळे प्रलंबित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अशा सर्व प्रकरणांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिले.

करमाड गट क्रमांक ८१ बाबत तात्काळ मोजणी करून हद्द व खुणा निश्चित करण्याचे निर्देश भूमी अभिलेख विभागाला देण्यात आले. तसेच गट क्रमांक ७४ मधील संपादित जमिनीच्या मोबदला वितरणाबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत इतर संबंधित विषयांवरही सखोल चर्चा झाली.

औद्योगिक प्रकल्पांना गती देण्यासाठी सर्व यंत्रणांनी सकारात्मक भूमिका घेऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी पापळकर यांनी दिले. यावेळी संबंधित यंत्रणाचे प्रमुख उपस्थित होते.

## गंगापूर दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा वाढता हस्तक्षेप सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर प्रतिनिधी सुभान शहा** / गंगापूर शहरातील दुय्यम निबंधक (दस्त नोंदणी) कार्यालयात सध्या अव्यवस्थेचे चित्र निर्माण झाले असून, दलालांचा वाढता हस्तक्षेप सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असून, कार्यालयातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक दस्त नोंदणीसाठी गंगापूर येथे येतात. मात्र, प्रक्रियेची सविस्तर माहिती नसल्याचा गैरफायदा घेत काही दलालांकडून नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहे. संबंधित दलाल काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून काम लवकर करून देण्याच्या नावाखाली जादा पैसे उकळत असल्याचेही समोर आले आहे. या प्रकारामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नागरिकांना विनाकारण अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेकदा आवश्यक कागदपत्रे असूनही काम वेळेत पूर्ण होत नसल्याने नागरिकांची आर्थिक लूट व मानसिक नुकसान होत आहे. परिणामी,




कार्यालयातील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, या सर्व प्रकारांबाबत संतप्त नागरिकांकडून संबंधित दलालांसह भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. तसेच दस्त नोंदणी प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि दलालमुक्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

सर्वसामान्य नागरिकांची सर्रास आर्थिक लूट सुरू सर्वसामान्य नागरिकांना दस्त नोंदणी प्रक्रियेदरम्यान कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे कारण देत

काही दलालांकडून सर्रास आर्थिक लूट केली

जात आहे. प्रक्रियेची अपुरी माहिती असल्याचा गैरफायदा घेत नागरिकांना भीती दाखवून जादा पैसे उकळले जातात. अनेक वेळा किरकोळ चुका मोठ्या दाखवून काम अडवले जाते, त्यामुळे नागरिकांना अनावश्यक आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. दलालांची कामे झटपट; सर्वसामान्य मात्र ताटकळत दस्त नोंदणी कार्यालयात दलालांमार्फत केलेली कामे वेगाने पूर्ण होत असल्याची चर्चा आहे, तर सर्वसामान्य नागरिकांना मात्र ताटकळत राहावे लागते. अधिकृत प्रक्रियेनुसार कागदपत्रे पूर्ण असूनही सामान्यांना वारंवार अडथळे येतात. याउलट दलालांच्या माध्यमातून काम करणाऱ्यांची कामे प्राधान्याने होत असल्याने गंगापूर दुय्यम निबंधक कार्यालयात व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

## वन्य जीवांसाठी वन विभागाने सुरु केला पाणी पुरवठा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** / कन्नड तालुक्यातील अत्यंत मोहक निसर्गरम्य म्हणून प्रशिद्ध असणारे तसेच संपूर्ण मराठवाड्याचे पर्यटन क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे गौताळा अभयारण्यात सद्या संपूर्ण पान गळती झाली असून, अरण्यातील वन्यजीवांना अन्न व पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.याचे वनविभागाचे वतीने निरीक्षण करून सदर प्राण्यांच्या उपजीविकेसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे.या अभयारण्यात बबटया,हरीण,नीलगाय तडस, काळविट, भोकर,खवल्या मांजर,कोल्हे,वानर,सह अनेक वन्यजीव वास्तव्यास आहेत.या सर्व जीवांना या उन्हाळ्याच्या दिवसांमुळे तसेच झाडांच्या पानगळतीमुळे अन्न पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यांची अडचण होऊ नये म्हणून वनविभागाने अरण्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे.या अभय आरण्यातून राज्य मार्ग रस्ता जात असल्यामुळे उन्हाळ्यात जंगलात आग लागू नये म्हणून रस्त्याच्या कडेला जाळ रेषाही आखण्यात आली आहे.नागरिकांनी कृपया अरण्य हद्दीत प्रवास करतांना ज्वालामुखी भडकेल व आरण्यातील वन्यजीवांसह आरण्याची हनी होणार नाही,याची काळजी घेणेसाठी प्रवास करतांना विडी,सिगारेट असे ज्वालामुखी आरण्यात फेकू नये असे आवाहन सहाय्यक वनरक्षक विशाल लोंढे व त्यांच्या टीमने प्रवशी नागरिकांना केले आहे.या टीममधे वनपारिक्षेत्र अधिकारी सचिन शिंदे कन्नड विभाग, सचिन रामपुरे नागद विभाग, मच्छिंद्र रहाटवल चाळीसगाव विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली ३२ वनरक्षक व ७२ वनमजूर या कामी दिवस-रात्र कार्य करीत आहे.आरण्यात या कालावधीत चुल - ग्यास व इतर ज्वालामुखी पेटविण्यास व त्यानुसार पार्टी करण्यास मज्जाव करण्यात आला आहे.



## सुरक्षित अन्नासाठी तपासणी मोहीम प्रभावीपणे राबवा- संभाजी अडकुणे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ नागरिकांना खाद्यपदार्थ सुरक्षित आणि दर्जेदार मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने वेळोवेळी विविध आस्थापनांची तपासणी करून अन्न , खाध्यपदार्थ नमुने यांची तपासणी प्रभावीपणे करावी. असे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांनी दिले. हॉटेल, स्वीटहोम ,दूध व पनीर दुग्धजन्य पदार्थ विक्रेते , यांच्याकडून वेळोवेळी नमुने घेऊन तपासणी करावी व भेसळ प्रकरणी दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन विभागाला देण्यात आले.

जिल्हास्तरीय अन्नसुरक्षा समितीच्या आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त दयानंद पाटील. आरोग्य अधिकारी डॉ.सारिका भावले, सहायक पोलीस उपनिरीक्षक सरला गाडेकर, सहायक पुरवठा अधिकारी संदीप शिंदे, प्रयोगशाळा विश्लेषक एस. बी बादाडे, उपशिक्षण अधिकारी दीपाली थावरे,व संबंधित अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षित आणि निर्भेळ अन्नपदार्थ मिळावेत यासाठी खाद्यपदार्थांच्या विक्री करणारे दुकानदार ,दूध, पनीर ,तूप ,भगर ,खाद्यतेल बर्फी व तसेच इतर खाद्य पदार्थांच्या मध्ये भेसळ होऊ नये यासाठी वारंवार स्वीट मार्ट आणि हॉटेल व विक्रेत्याच्या दुकानांची तपासणी करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यात असणाऱ्या सर्व खाद्यपदार्थ विक्री करणारे व उत्पादन करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकूणे यांनी दिले. भेसळ करणाऱ्यां दुकानदारावर प्रतिबंध आणि दंडात्मक कारवाई करून त्यांचे परवानेही निलंबित करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. खाद्यपदार्थातील भेसळ ओळखण्यासाठी प्रयोगशाळेच्या माध्यमातून अन्न व औषध प्रशासनाने सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाणीव जागृती करणारे उपक्रम राबवावेत जेणेकरून सुरक्षित अन्न आणि आरोग्य अबाधित राहील.

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये दोन कोटी ४२ लाख १५ हजार ५९ किमतीचा अवैध साठा जप्त करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात होत असलेल्या विविध तक्रारीचे निराकरण करून संबंधित आस्थापनावर तपासणी व कायदेशीर कारवाई करण्यात येते. यामध्ये १३० प्रकरण न्यायप्रविष्ट असून ३० प्रकरण निकाली निघाले असल्याचे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त दयानंद पाटील यांनी प्रस्ताविकात सांगितले.

# संक्षिप्त

## जिल्हा निर्देशांकात जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा राज्यात प्रथम क्रमांकाने सन्मानित

### जिल्हा प्रशासनातील गुणवत्ता व उत्कृष्टतेचा सन्मान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** लोकसत्ताच्या जिल्हा निर्देशांक या उपक्रमाचे यंदा चौथे वर्ष असून सांख्यिकी विभागाकडे असलेल्या तपशिलाच्या आधारे पुणे येथील विख्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून विविध जिल्ह्याच्या कामगिरीचे विश्लेषण केले गेले. त्यानूसार जालना जिल्ह्याने विविध विकास निर्देशांकाबाबत प्रथम क्रमांक नोंदविला आहे. त्यानूसार जालना जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत 'गट-१' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि.२० मार्च २०२६ रोजी हॉटेल ताज विवांता मुंबई येथे करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार केला.प्रशासकीय गतिमानता आणि लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात जिल्हा प्रशासनाला मोठे यश आले आहे. या लक्षणीय यशाबद्दल जिल्ह्याचा विशेष सन्मान करण्यात आला असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हा मानाचा पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारले आहे. या यशाबद्दल बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, हा बहुमान जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यातील जनतेच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे. भविष्यातही जालना जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत अग्रस्थानी ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जालना जिल्ह्याला मिळालेल्या या गौरवामुळे सर्व स्तरातून प्रशासनाचे कौतुक होत असून मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## ६ एप्रिल रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

## नवउद्योजकांसाठी मार्गदर्शन मेळावा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आणि नवउद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि 'दे आसरा' फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात नवउद्योजकांसाठी विशेष उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दि. २४ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या मेळाव्यात जिल्ह्यातील सूक्ष्म व अतिसूक्ष्म उद्योजकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र राज्यात सूक्ष्म उद्योग हे रोजगाराचे महत्त्वाचे साधन आहेत. मात्र, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि वित्तीय व्यवस्थापन अशा क्षेत्रांत उद्योजकांना अनेकदा अडचणी येतात. या मेळाव्याचा मुख्य उद्देश उद्योजकांना या विषयांवर मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यातील नेटवर्किंग वाढवणे हा होता. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. 'दे आसरा' फाउंडेशनच्या वतीने राहुल लिमये यांनी 'मार्केटिंग तंत्र' या विषयावर, तर किरण धगे यांनी 'उद्योजकतेची वाटचाल' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच स्नेहा नन्नवरे यांनीही उपस्थित नवउद्योजकांशी संवाद साधून मोलाच्या टिप्स दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले तर आभार भुजंग रिठे यांनी मानले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कौशल्य विकास विभागाचे अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, नितीन लोकडे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, योगेश बहुरे, दीपक पालवे व गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.


## महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

**ई - निविदा सुचना क्रमांक (४१) २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना (दुरध्वनी क्रमांक -०२४८२ -२०३०१४३) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडुन जालना जिल्हयातील खालील (२३) कामां करीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑन लाईन) व्दारे मागविण्यात येत आहे.

टिप :-

१) निविदा कागदपत्राचा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकतेत स्थळावर https://mahatenders.gov.in आणि http://mahapwd.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. २) सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल. ३) निविदा स्विकारण्यायचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना यांनी राखुन ठेवला आहे. ४) अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना.**

**आरओसी/२०२५-२०२६/क्र-५/C६७७२**


# पोहरागड येथे ऐतिहासिक बंजारा जनजागृती मेळावा व हेलिकॉप्टर पुष्पवृष्टी; लाखोंनी उपस्थित राहावे - अर्जुन नायक

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर/जालना/**बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र पोहरागड येथे यंदा चैत्र नवरात्री निमित्त दुहेरी ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळावा आणि माताजी मंदिरावर प्रथमच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी असा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश संघटक अर्जुन नायक यांनी केले आहे.

बंजारा ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास देशभरातील संत-महंत व बंजारा समाजातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, अनंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज, महंत खुशाल महाराज, महंत प्रकाश महाराज यांच्यासह अनेक मान्यवर या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत.

दरम्यान, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून पोहरागडावरील पवित्र माताजी मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सकाळी ९ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या उपक्रमामुळे संपूर्ण बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षी लाखो भाविक माता जगदंबा, संत सेवालाल महाराज व रामराव बापू यांच्या दर्शनासाठी पोहरागड येथे येतात. मात्र यंदाचा सोहळा विशेष ठरणार असून धार्मिक आणि सामाजिक एकजुटीचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळणार आहे.

याच दिवशी पोहरादेवी येथे सायंकाळी ५ वाजता बामणगाव रोडवरील महाराज मंदिर मैदानात अखिल भारतीय बंजारा समाज जनजागृती मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा होणार असून विशेषतः एसटी आरक्षणासह विविध



महत्त्वाच्या विषयांवर दिशा ठरवली जाणार आहे.

महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याने हा मेळावा ऐतिहासिक ठरणार आहे. समाजाच्या एकजुटीचा संदेश देणाऱ्या या भव्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व भटक्या-विमुक्त बंजारा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अर्जुन नायक यांनी केले आहे.

## उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल रवींद्र पाईकराव यांचा जिल्हा परिषदेतर्फे गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/**जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक रवींद्र पाईकराव यांनी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) पी. एम. मिनू यांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



याप्रवेळी जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मस्के, डॉ. पवार आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी. एम. कुंडलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पाईकराव यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी राबवलेले उपक्रम आणि रुग्णांना दिलेली तत्पर सेवा दखलपात्र ठरली आहे.या सोहळ्याला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रघुवीर चंदेल, डॉ. नागदरवाड, डॉ. काकड यांच्यासह सुनील बोकन, पौर्णिमा सोनवणे व तालुक्यातील आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे छायाचित्रण किरण खानापुरे यांनी केले. या यशामुळे पाईकराव यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.


# जालना येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड रुद्र अभिषेक सप्ताहाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शहरातील कचेरी रोड परिसरातील प्राचीन वटवृक्ष हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त यंदाही अखंड रुद्र जलबारा अभिषेक सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २६ मार्च ते गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ दरम्यान हा धार्मिक सोहळा भक्तिभावाने साजरा होणार असून, यावर्षीही मोठ्या संख्येने भाविकांच्या सहभागाची अपेक्षा आहे. गेल्या सुमारे २९ वर्षांपासून अखंड परंपरेने सुरू असलेला हा धार्मिक उपक्रम स्वर्गीय वेदशास्त्रसंपन्न मोहन फुलंब्रीकर (पाठक) यांनी प्रारंभ केला होता. समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि मानसिक भीती दूर करून धार्मिक व आध्यात्मिक प्रबोधन घडविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो.

या सप्ताहादरम्यान दिवसरात्र अकरा ब्राह्मणांच्या माध्यमातून गणपती, महादेव, देवी व हनुमान पंचायतन यांचे विधिवत पूजन, अथर्वशीर्ष, रुद्र, पवमान, चिंतन-मनन आदी धार्मिक विधी पार पडणार आहेत. तसेच जनकल्याण, नैसर्गिक आपत्ती निवारण, पितृदोष, कालसर्प दोष, नवग्रह बाधा आदी समस्यांच्या निवारणासाठी विविध धार्मिक विधी करण्यात येणार आहेत. दररोज सायंकाळी ७ वाजता प्रदोष पूजेचे आयोजन करण्यात येणार असून, विविध समाजघटकांतील भाविक तन, मन, धनाने या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. बालाजी महिला भजनी मंडळ यांच्यावतीने दररोज दुपारी ४ ते ६ या वेळेत भजन व सामूहिक गीता पठण होणार आहे.

या सप्ताहाचे यजमान म्हणून ॲड. संजय देशपांडे, राजेंद्र बारवाले, सुरेश अग्रवाल (शितल), भास्करराव दानवे, राजेश राऊत, अशोक पांगारकर, चक्रधर खोतकर, डॉ. संजय राख, डॉ. सबनीस, डॉ. निरज परितकर, वैद्य मंगल, शुक्लाजी, सत्यनारायण भारुकाजी, भाषेश पटेल, अरुण अग्रवाल, संजय अग्रवाल, राजेश सोनी, सुनील गोयल, अनिल गोयल, ॲड. तवरावाला, कुमार देशपांडे, जितेंद्र पित्ती, भवन लाड, राजेंद्र दायमा, श्रीपाद रत्नपारखी, भूपेश केनिया, अभय कुलकर्णी, संजय ख्रिस्ते, ॲड. जगदीश बडवे, ॲड. बलवंत नाईक, ॲड. विष्णुपंत किनगावकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभत आहे.तसेच वेदशास्त्रसंपन्न



विनायक महाराज फुलंब्रीकर, विजय महाराज फुलंब्रीकर व भगवती पुरोहित संघाचे ब्रह्मवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी पार पडणार आहेत.

याशिवाय शालिकराम म्हस्के, अतुल वझरकर, अरविंद भोसले, महेश जोशी, दिनेश फलके, प्रल्हाद हरबक, श्रीनिवास इंदानी, महेश रत्नपारखी, घिरल मेवाडे, लक्ष्मीकांत नाईक, शंकर तुंगे, ॲड. ललित हट्टेकर, आनंद मोहिदे, संजय भालेराव, गणेश सुपारकर, अजय गरड, मकरंद जहागिरदार, व्यंकट देशमुख, आदित्य जोशी, वेदांत फुलंब्रीकर आदींचा सहभाग आहे.हनुमान जन्मोत्सव दिनी, गुरुवार दि. २ एप्रिल रोजी दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हनुमान मंदिर वटवृक्ष संस्थान, प्राचीन जालना यांच्या वतीने सर्व भाविकांनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी होऊन आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## देशासाठी शहीद झालेल्यांची आठवण सतत ठेवावी-डॉ.चंद्रसेन कोठावळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** पाचोड शिवछत्रपती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये बलिदान दिन साजरा करण्यात आला.बलिदान दिनानिमित्ताने शहीद भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदानाची आठवण करून देत त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सोलापूर येथील ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एम.बेटकर उपस्थित होते.तर अध्यक्षीयस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले.डॉ. बेटकर यांनी शहीद भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव यांच्या त्यागाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की,या क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च




बलिदान दिले असून त्यांच्या कार्यामुळे स्वातंत्र्यलढ्यात सर्वसामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण झाली.त्यांचे बलिदान हे देशभक्ती,देशसेवा आणि देशप्रेम यांचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय समारोपात डॉ.कोठावळे यांनी स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या योगदानाची आठवण करून दिली.त्यांनी सुभाषचंद्र बोस तसेच 'बाल,लाल आणि पाल' या त्रयीचा उल्लेख करत स्वातंत्र्य सहजासहजी मिळाले नसून अनेकांनी प्राणांचे बलिदान दिल्यानंतरच देशाला स्वातंत्र्य लाभले,असे सांगितले.आज आपण उपभोगत असलेले स्वातंत्र्य हे या हुतात्म्यांच्या त्यागाचे फलित असल्याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ह.सो.बिडवे यांनी केले आभार प्रा.संदीप सातोणकर यांनी मानले.यावेळी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव, डॉ.संतोष चव्हाण,डॉ.सुभाष पोटभरे,डॉ. विलास महाजन,डॉ.हेमंत कुमार जैन,डॉ.उत्तम जाधव,प्रा. विनोद कांबळे,प्रा.सचिन कदम,प्रा. नितीन चित्ते आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबड तालुक्यातील डोमेगावचे शेळके दाम्पत्य स्वप्नल फाऊंडेशनच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील बाबासाहेब शेळके व सविता शेळके यांना उल्लेखनीय सामाजिक कार्य केल्याबद्दल काल सोमवार दि. २३ रोजी पुणे येथे स्वप्नल फाऊंडेशनच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



मराठी अभिनेत्री दिपीका माथवड यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.पुणे महानगर पालिकेच्या सावित्रीबाई फुले स्मारकातील सांस्कृतिक केंद्रात पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील जे.जे रुग्णालयातील औषध वैधकशास्त्र विभागप्रमुख डॉ.मधुकर गायकवाड हे होते. तसेच उपसहाय्यक निबंधक डॉ. राजाराम धोंडकर,मराठी अभिनेत्री दिपीका माथवड,पुणे रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भवाळकर,वास्तुविशारद आनंद पिंपळकर,दिग्दर्शक योगेश देशमुख,गीतांजली कोळी,भानुप्रताप बर्गे, रुक्मिणी गलांडे,विलास दांगट,काका चव्हाण,शिवाजी कोळी,सचिन निवगुणे,दत्ता कोहीनकर,बाळकृष्ण नेहरकर आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

या पुरस्कार सोहळ्यास स्वप्नल फाऊंडेशनच्या अध्यक्षा शोभाताई बल्लाळ,सचिव मयूर बल्लाळ, उपाध्यक्ष रवी सावंत,सई गोंधनेकर,उज्वला गायकवाड,सुजाता दळवी तसेच डोमगाव येथील माजी सरपंच निर्मलाताई चौथमल आदींची उपस्थिती होती.शेळके दाम्पत्यास यापूर्वी उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल विविध सामाजिक संस्थांनी पुरस्कार देऊन गौरवले आहे.

# भोकरदनवर पाणीसंकट: ५२ लाखांच्या थकबाकीमुळे जुई धरणावरील जॅकवेल सील

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/प्रतिनिधी/** शहराची तहान भागवणाऱ्या दानापूर येथील जुई धरणावरील नगर परिषदेचा जॅकवेल अखेर जलसंपदा विभागाने पोलीस बंदोबस्तात सील केला आहे. नगर परिषदेने पाणीपट्टीचे तब्बल ५२ लाख ६४ हजार ४८९ रुपये थकवल्यामुळे ही टोकाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर भोकरदन शहराचा पाणीपुरवठा खंडित झाला असून, नागरिकांवर पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे.

भोकरदन नगर परिषद जुई धरणातून शहराला पाणीपुरवठा करते. मात्र, गेल्या काही काळापासून या पाणीपुरवठ्याचे देयक (पाणीपट्टी) जलसंपदा विभागाकडे जमा करण्यात आले नव्हते. थकीत रक्कम: ५२,६४,४८९ रुपये. वारंवार सूचना: जलसंपदा विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांनी यापूर्वी अनेकदा लेखी पत्रे देऊन आणि वर्तमानपत्रांतून जाहीर आवाहन करून थकबाकी भरण्याची विनंती केली होती. अंतिम मुदत: प्रशासनाने २३ मार्च २०२६ पर्यंतची अंतिम मुदत दिली होती. मात्र, मुदत संपूनही पैसे न भरल्या गेल्याने ही कारवाई करण्यात आली.

**पोलीस बंदोबस्तात कडक कारवाई**

केवळ नोटिसा देऊनही प्रतिसाद मिळत नसल्याने, जलसंपदा विभागाने आक्रमक पवित्रा घेतला. सोमवारी (२३ मार्च) जुई धरणावरील जॅकवेलवर जाऊन तो अधिकृतपणे सील करण्यात आला.

यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जॅकवेल सील केल्याने आता शहराला होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

नागरिकांचे हाल आणि उन्हाळ्याची दाहकता

जालना जिल्ह्यात आधीच पाणीटंचाईची सावट आहे. त्यातच भोकरदनसारख्या मोठ्या



शहराचा पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

पाणीटंचाई: शहरात आता टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येऊ शकते. आर्थिक फटका: नागरिकांना आता विकतचे पाणी घ्यावे लागण्याची शक्यता आहे.

प्रशासकीय दिरंगाई: नगर परिषदेने वेळेवर नियोजन का केले नाही, असा प्रश्न सर्वसामान्य जनता विचारत आहे. महत्त्वाची टीप: जलसंपदा विभागाने केवळ पाणीच नव्हे, तर वीज पुरवठाही खंडित करण्याचा इशारा पत्रात दिला होता, त्यानुसार आता वीज कंपनी काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.

मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813